महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २४ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

## शहापूरकरांसाठी सक्षम पाणी पुरवठा योजना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर /राजेश जागरे :** सद्यस्थितीत अंदाजे २५ ते ३० हजार लोकसंख्या असलेल्या शहापूर नगरपंचायतीला पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे यांच्या अथक प्रयत्नाने ४० कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर होत असून तिचा अंतरिम मंजूरी आदेश येत्या जून अखेरपर्यंत देण्याचे आदेश पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले असल्याची माहिती जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे यांनी प्रस्तुत प्रतिनिधिशी बोलतांना दिली. सन २०११ च्या जनगणनेनुसार शहापूर नगरपंचायत हद्दीतील लोकसंख्या ११ हजार ६२३ इतकी होती. तथापि १३ वर्षांनंतर हीच लोकसंख्या २५ हजारांवर गेली असल्याचे उपनगराध्यक्ष विजय भगत यांनी प्रस्तुत प्रतिनिधिशी बोलतांना सांगितले.पूर्वी शहापूरात कमी लोकसंख्या असल्याने गोठेघर, चेरपोली व कळंभे या ग्रामपंचायतीं च्या हद्दीतील काही नळधारकांना या पाणी योजनेतून पाणीपुरवठा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान सध्याच्या आकडेवारीनुसार शहापूर नगरपंचायत हद्दीतील सुमारे २५ हजाराच्यावरील नागरिक शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या प्रतिक्षेत असून या योजनेमुळे शहापूरकरांची पाण्याची तहान भागवली जाणार आहे.दरम्यान शहापूर नगरपंचायतीसाठी नवीन पाणीपुरवठा योजना मार्गी लावण्याकरिता शिवसेनेचे ठाणे ग्रामीण जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे यांच्या पुढाकाराने २२ मे २०२५ रोजी सह्याद्री अतिथी गृहात पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.सदर बैठकीत शहापूर नगरपंचायतीसाठी नवीन पाणीपुरवठा योजनेस जून महिन्याच्या अखेरपर्यंत मंजूरी देण्याचे आश्वासन दिले.सदर बैठकीस नगरविकासचे अप्पर सचिव असीम गुप्ता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव ई. रवींद्रन,जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे,शहापूर नगरपंचायत मुख्याधिकारी शिवराज गायकवाड, शिवसेना शहरप्रमुख तथा शहापूर नगरपंचायत उपनगराध्यक्ष विजय भगत,पाणी पुरवठा सभापती रणजीत भोईर,नगरसेवक आनंद झगडे, इंद्रजीत सूर्यराव,रुपेश कोंडे, अजिंक्य हुलवले,भूषण शेट्टी इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.शहापूर नगरपंचायतची नवीन पाणीपुरवठा योजना मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून लवकरच शहापुरातील नागरिकांना स्वच्छ व मुबलक पाणी देण्यात येईल.



*शहापूर नगरपंचायतीची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे येथील नागरिकांची मुबलक पाण्यावाचून कुचंबना होत असते.ही समस्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर टाकताच त्यांनी विशेष पुढाकार घेत सदर योजना मंजूर करण्याचे आश्वासन दिले. त्यानुषंगाने पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी मंत्रालयात मिटिंग घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांना हे काम तात्काळ मार्गी लावण्याचे आदेश दिले. ■ मारुती धिर्डे, जिल्हाप्रमुख शिवसेना ठाणे जिल्हा.*

## बुलेट ट्रेनविरोधात भिवंडीकरांचा एल्गार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मुंबई-बडोदा बुलेट ट्रेनने भिवंडीकरांची नाकाबंदीच केली आहे. बुलेट ट्रेनच्या कारशेडचे काम करताना प्रशासनाने तालुक्यातील भरोडी गावाला जोडणारा मुख्य रस्ताच परस्पर खोदून ठेवला असून ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना तब्बल पाच ते सहा किलोमीटरची फरफट करावी लागत आहे. इतकेच नाहीतर शेतकऱ्यांनाही आपल्या शेतात जाताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देऊनही कानाडोळा केला जात असल्याने संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरत आंदोलन केले.

बुलेट ट्रेन व कारशेडमुळे भिवंडी तालुक्यातील मौजे भरोडी येथील अनेक शेतकरी बाधित होत आहेत. येथील ग्रामस्थांना विश्वासात न घेताच बुलेट ट्रेनचे अधिकारी मनमानीपणे काम करीत आहेत. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. भरोडी गावाला जोडणारा एकमेव मुख्य रस्तादेखील अशाच पद्धतीने खोदण्यात आला आहे. पावसाळयात याठिकाणी चिखलाचा प्रचंड राडारोडा होणार असून गावकऱ्यांचे चालणे मुश्कील होणार आहे. त्यातच रस्त्याच्या दुरवस्थेमुळे

पाच ते सहा किलोमीटरच्या अधिकचे अंतर चालावे लागणार आहे. वृद्ध, विद्यार्थी यांची सर्वाधिक फरफट होणार आहे. याबाबत अनेकदा तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जात असल्याने शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंदन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य देवेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज आंदोलन करण्यात आले. यावेळी सरपंच विलास पाटील, उपसरपंच संगीता पाटील, सामाजिक कार्यकर्ते विनोद पाटील तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

**भुयारी मार्ग बांधून द्या !**
**बुलेट ट्रेनचे अधिकारी प्रणव पाटील यांना ग्रामस्थांनी निवेदन दिले. रस्त्याचा प्रश्न कायमचा मिटावा यासाठी भुयारी मार्ग बांधून द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान २१ मार्च रोजी या सर्व समस्यांबाबत ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी भूसंपादन अधिकारी तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांची भेट घेत निवेदन दिले होते. मात्र तीन महिने व्हायला आले तरी प्रशासनाने याची दखल घेतली नाही, असा आरोप सरपंच विलास पाटील यांनी केला आहे.**





## मतदान केंद्रांवरील मोबाईलची चिंता मिटली

### निवडणूक आयोगानं घेतला विशेष निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मतदारांच्या सोयीसाठी आणि मतदान दिवशीच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने, भारत निवडणूक आयोगाने दोन महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केले आहेत. त्यानुसार, मतदान केंद्राच्या बाहेर मोबाईल ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असून, प्रचारासाठीची मर्यादा देखील नव्याने निश्चित करण्यात आली आहे. हे निर्णय लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ आणि निवडणूक आचारसंहिता, १९६१ यांच्याशी सुसंगत आहेत.

मोबाईल फोनचा ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये वाढता वापर लक्षात घेता, तसेच वृद्ध, महिला आणि दिव्यांग मतदारांना येणाऱ्या अडचणींचा विचार करता, आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेरच मोबाईल ठेवण्याची सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत केवळ बंद अवस्थेतील मोबाईल्स नेण्यास परवानगी राहील.

## सरकारी कॅमेऱ्यांवर चोरट्यांनी नजर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण पश्चिमेतील गणेशघाट भागातील प्रेम ऑटो चौकात परिसरातील नियंत्रणासाठी लावण्यात आलेल्या शासकीय कॅमेऱ्यांच्या मुख्य नियंत्रण पेटीतील कॅमेऱ्यांच्या १६ बॅटऱ्या चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत. अशाप्रकारे बॅटऱ्या चोरून यंत्रणा बंद पाडणाऱ्या अज्ञात चोरट्यांविरुध्द कॅमेरा नियंत्रक कंपनीने महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण पश्चिमतील वैकुंठधाम स्मशानभूमी भागातील गणेशघाट भागात प्रेम ऑटो चौकात एका कंपनीने परिसर नियंत्रणासाठी शासकीय कॅमेरे बसविले आहेत.

या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून परिसराचे नियंत्रण केले जाते. या नियंत्रण ठेवणाऱ्या कॅमेऱ्यांच्या मुख्य नियंत्रण पेटीतील एकूण १६ बॅटऱ्या अज्ञात चोरट्यांनी गुरुवारी रात्री दोन वाजण्याच्या दरम्यान चोरून नेल्या आहेत. या बॅटऱ्यांची बाजार भावाची किंमत ८० हजार रूपये आहे. कॅमेऱ्यातील बॅटऱ्या काढून नेल्यानंतर त्या भागातील यंत्रणेवर परिणाम झाला. याची माहिती कंपनी नियंत्रकांना समजताच त्यांनी मुख्य नियंत्रण कक्षाची पाहणी केली. चोरट्यांनी विजेऱ्या चोरून नेल्याचे लक्षात आले. कॅमेरा नियंत्रण कंपनीचे अधिकारी शिशीर भोगले यांनी याप्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

## ठाणे जिल्ह्यात १५ दिवसांत अवकाळी पावसाचे १६ बळी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे :** जिल्ह्यात गेल्या १५ दिवसांत झालेल्या वादळ वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसामुळे इमारत दुर्घटना, वीज, झाडे पडून १६ जणांचा मृत्यू झाला आहे. गाय, म्हैस अशी तीन पशुधन दगावला आहेत. तसेच इमारतीसह १०७ घरांची पडझड होऊन नागरिक बेघर झाले. ३०३ शेतकऱ्यांच्या फळबागा, तृणधान्य आणि भाजीपाल्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार गेल्या १५ दिवसांपासून ठाणे जिल्ह्यात कमी-अधिक प्रमाणात अवकाळी पाऊस पडत आहे. ठाण्यासह मुरबाड, शहापूर, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगर या तालुक्यांमधील नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागले. घरांवरील पत्रे व कौले उडून रहिवाशांचे मोठे नुकसान झाले. कल्याणला पूर्वेला इमारत कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला. तत्पूर्वी कल्याण शहरात रिक्षावर झाड पडून तीन जणांचा मृत्यू झाला होता.

स्फोटात एक, वीज पडून तिघांचा मृत्यू शहापूरला शॉर्टसर्किटमुळे गॅस सिलिंडरच्या स्फोटात एका व्यक्तीचा तर वीज पडून तीन जणांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. ठाणे शहरात झाड पडून एक जण दगावला. मुरबाड तालुक्यात दोघांवर वीज पडून ते मरण पावले. ८८ हेक्टरवरील फळबागा, भाजीपाल्यांचे नुकसान जिल्ह्यात वादळी वाऱ्यामुळे अंशतः पडझड झालेल्या घरांमध्ये सर्वाधिक ७२ घरे शहापूर तालुक्यामधील आहेत. या खालोखाल भिवंडी तालुक्यातील २५ घरांची पडझड झाली. कल्याण तालुक्यामधील पाच घरे असून, उल्हासनगर शहरातीलही पाच घरांचे मोठे नुकसान झाले. शहापूर तालुक्यात दोन गायी आणि एक म्हैस दगावली. ३०३ शेतकऱ्यांना तब्बल ८८ हेक्टर शेतजमिनीवरील फळबागा, भाजीपाला, तृणधान्याच्या नुकसानीला तोंड द्यावे लागले आहे. यामध्ये मुरबाड तालुक्यातील ५६ हेक्टरवरील आंब्याच्या बागांच्या नुकसानीचा १९४ शेतकऱ्यांना फटका बसला. शेती नुकसानीमुळे मुरबाडचे ३३ गावांमधील शेतकरी बाधित झाले. भिवंडी तालुक्यामधील ३२ गावांच्या १०२ शेतकऱ्यांना ३२ हेक्टरचे नुकसान झाले. कल्याणमधील चार गावांच्या सात शेतकऱ्यांना तीन हेक्टरवरील शेतीच्या नुकसानीचा फटका बसला.

## केडीएमसी हद्दीत ५५% नालेसफाई पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या दहा प्रभाग क्षेत्रातील गटारे व नालेसफाईची कामे सुरू असून ५५ टक्क्यांपर्यंत ही कामे झाली असली तरी पावसाळयापूर्वी ही कामे पूर्ण करून घेण्याचे उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण होईल असा विश्वास मला निसारण विभागाचे कार्यकारी अभियंता घनश्याम नवांगुळ यांनी व्यक्त केला. मलनिःसारण विभागातर्फे या कामासाठी सात ठेकेदार नेमले असून नालेसफाईच्या कामासाठी चार ठेकेदारांना हे काम देण्यात आले आहे. २०२४ २५ च्या



अंदाजपत्रकामध्ये नालेसफाईसाठी चार कोटी २९ लाख ८१ हजार रुपयांचा ठेका कमी प्रमाणात ठेकेदारांनी मान्य केल्याने तीन कोटी ५८ लाख २५ हजार पर्यंत ही कामे केली जाणार आहेत, तर लहान व मध्यम गटार सफाईसाठी तीन कोटी ६९ लाख २८ हजारांची निविदा तीन कोटी दहा लाख ४२ हजार पर्यंत बिलो टेंडरने देण्यात आलेली आहे.

## पालघरला नवे परिवहन कार्यालय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघरला नवे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर झाले आहे. त्यानुसार पालघर जिह्याला आता 'एमएच-60' अशी नवीन परिवहन ओळख मिळाली आहे. त्यामुळे पालघरच्या ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला यापुढे परिवहनविषयक कामासाठी वसई-विरारला जाण्याची आवश्यकता भासणार नाही. नागरिकांचा वेळ, श्रम तसेच पैशांची बचत होणार आहे. पालघरला उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्याची मागणी नागरिकांकडून वेळोवेळी केली जात होती. अखेर ही मागणी सरकारने मंजूर केल्यामुळे पालघरच्या ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. जिह्यात नोंदणी होणाऱ्या वाहनांना यापुढे 'एमएच-60' असा क्रमांक मिळणार आहे.











## गीतासार



### अध्याय ११
### विश्वरूपदर्शनयोगः

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व । अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ ११-४० ॥

हे अनंत सामर्थ्यशाली, आपल्याला पुढून व मागूनही नमस्कार. हे सर्वात्मका, आपल्याला सर्व बाजूंनीच नमस्कार असो. कारण अनंत पराक्रमशाली अशा आपण सर्व जग व्यापले आहे. म्हणून आपण सर्वरूप आहात. ॥ ११-४० ॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति । अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥ ११-४१ ॥ यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु । एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ११-४२ ॥

आपला हा प्रभाव न जाणवल्यामुळे, आपण माझे मित्र आहात असे मानून प्रेमाने किंवा चुकीने मी हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या, असे जे काही विचार न करता मुद्दाम म्हटले असेल, आणि हे अच्युता, माझ्याकडून विनोदासाठी फिरताना, झोपताना, बसल्यावेळी आणि भोजन इत्यादी करताना आपला एकांतात किंवा त्या मित्रांच्या समक्ष जो अपमान झाला असेल, त्या सर्व अपराधांची अचिंत्य प्रभावशाली अशा आपणाकडे मी क्षमा मागत आहे.
॥ ११-४१, ११-४२ ॥

पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् । न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ॥ ११-४३ ॥

आपण या चराचर जगताचे जनक आहात. तसेच सर्वश्रेष्ठ गुरू व अत्यंत पूजनीय आहात. हे अतुलनीयप्रभावा, त्रैलोक्यात आपल्या बरोबरीचाही दुसरा कोणी नाही. मग आपल्याहून श्रेष्ठ कसा असू शकेल? ॥ ११-४३ ॥

## आरोग्य

### व्हिटॅमिन डी युक्त फळं

सूर्यप्रकाशात काही वेळ बसणं हे शरीरासाठी आवश्यक असतं, कारण यामुळे शरीरात नैसर्गिकरीत्या व्हिटॅमिन D तयार होतं. मात्र अनेक कारणांमुळे लोक घरातच राहतात, बाहेर जाणं कमी होतं आणि त्याचा परिणाम शरीरातील व्हिटॅमिन D च्या कमतरतेवर होतो. हाडं कमकुवत होणे, थकवा येणे, सतत आजारी पडणं, सांधेदुखी, पाठदुखी यासारख्या लक्षणांमागे व्हिटॅमिन D चा अभाव असतो.

काही फळं ही नैसर्गिकरित्या शरीराला व्हिटॅमिन D मिळवण्यासाठी उपयोगी ठरतात. चला तर मग जाणून घेऊया अशा ५ फळांबद्दल जी आयुर्वेदानुसार हाडं बळकट करतात आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवतात.

**आवळा :** आयुर्वेदात आवळ्याला 'रसायन' मानलं गेलं आहे. यामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स, कॅल्शियम, आणि थोड्या प्रमाणात व्हिटॅमिन D सुद्धा आढळतं.

**संत्र :** दररोज १ संत्र खाल्ल्याने हाडं मजबूत राहतात आणि थकवा जाणवत नाही.

**केळी :** केळीतील मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हे दोन्ही घटक व्हिटॅमिन D च्या शरीरातील कार्यक्षमतेसाठी आवश्यक असतात. त्यामुळे हाडांची मजबुती वाढते आणि स्नायूंना ऊर्जा मिळते.

**नारळ :** नारळामध्ये नैसर्गिक फॅट्स असतात जे शरीराला व्हिटॅमिन D शोषायला मदत करतात, विशेषतः जर सूर्यप्रकाशात थोडावेळ घालवला तर त्याचा प्रभाव अधिक वाढतो.

**चिकू :** चिकू हे अशा फळांपैकी एक आहे जे शरीराच्या झिजलेल्या पेशींना ऊर्जा देतं, आणि व्हिटॅमिन D चं कार्य योग्यरित्या होण्यासाठी आधार देतं

---

तेथे कर माझे जुळती

# शहीद कर्तार सिंग सराभा जयंती

### २४ मे १८९६-१६ नोव्हेंबर १९१५



प्रसिद्ध क्रांतिकारी भगत सिंग हे ज्यांना आदर्श मानीत असत अशा कर्तार सिंग यांची आज जयंती आहे. त्यांचा जन्म 24मे1896 रोजी पंजाब येथील लुधियाना जिल्ह्यातील सराभा या गावी झाला.कर्तार सिंग हे लहान असताना त्यांचे वडील मंगल सिंग वारले.त्यांच्या लहान चुल त्यानी त्यांचा सांभाळ केला. त्यांचे प्राथमिक शिक्षण लुधियाना येथे तर दहावीपर्यंतचे शिक्षण ओरिसा येथे काकांकडे झाले.अकरावीची परीक्षा ते रेवेनशा कॉलेज ओरिसा मधून उत्तीर्ण झाले.नंतर उच्च शिक्षणासाठी त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना 1 जानेवारी 1912रोजी अमेरिका येथे पाठविले.

अमेरिका येथील वास्तव्या दरम्यान कर्तार सिंग यांना अपमानजनक वागणूक मिळाली.एक प्रसंग जाणीवपूर्वक येथे नमूद करण्यात येत आहे.एक वृद्ध महिलेच्या घरात ते भाडेकरू म्हणून रहात असताना त्यांनी असे दृश्य पाहिले की,अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रत्येक नागरिक स्वत:चे घर सजवून आनंद व्यक्त करतो. आपल्या देशाचाही स्वातंत्र्य दिवस असाच साजरा व्हायला हवा,असा विचार त्यांच्या मनात आला.तो क्षण कधी येईल?

तत्कालीन भारतीय तरुणांची स्थिती:-

रेल्वे कार्यशाळेत व इतर कारखान्यात कार्यरत असलेल्या भारतीय मुलांना कॅनडा व अमेरिकेतील वर्णद्वेषी कृतीमुळे भेदभाव पूर्ण वागणुकीचा सामना करावा लागत असे .त्याकाळी ज्वाला सिंग थथियान यांनी भारतातील विद्यार्थ्यांना अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी आमंत्रित केले होते आणि त्यांच्या शिक्षणासाठी स्वतः शिष्यवृत्ती ज्वाला सिंग देत असत .ज्वालासिंग यांच्या प्रेरणेने कर्तार सिंग बर्कले विद्यापीठात रसायनशास्त्र शिकू लागले .सदर विद्यापीठात सिंग पंजाबी वस्तीगृहात राहू लागले. पंजाबी ,बंगाली मिळून तीस विद्यार्थी बर्कले विद्यापीठात शिकत असताना ते लाला हरदयाळ यांच्या संपर्कात आले. लाला हरदयाळ यांच्या भाषणांनी ते प्रोत्साहित झाले. त्यांनी भारताच्या गुलाम गिरीबद्दल विद्यार्थ्यांना अत्यंत भावनिक असे भाषण दिले. तसेच त्यांनी वैयक्तिकरित्या संवाद साधला. भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात लाला हरदयाळ व भाई परमानंद यांनी मोठी भूमिका बजावली. देशभक्तीची तीव्र भावना सराभांच्या मनात निर्माण झाली आणि देशासाठी आयुष्य खर्ची घालण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली. भारतीय शेतकरी व मजूर परदेशात स्थायिक झाले. आपला देश अंधारात पिचू लागला होता. 1857 चे पहिले स्वातंत्र्य समरातील अपयशानंतर ब्रिटिश सरकारने सत्ता स्थापन केली .दडपशाहीचे धोरण अवलंबिले. भारतात वसाहतवादी व्यवस्था निर्माण केली. भारताचे आर्थिक शोषण करण्यात आले आणि ब्रिटिश सरकारने भारतातील सरंजामदारांना आपले मित्र बनवून शेतकऱ्यांवर भयंकर अत्याचार सुरू केले. शेतकऱ्यांची स्थिती दयनीय झाली होती .परिणामी विद्यार्थी शिक्षणासाठी आणि सर्वसामान्य तरुण मजुरीच्या शोधात देश सोडून इंग्लंड अमेरिका व युरोपीय देशांमध्ये जाऊ लागले.

1913साली ते गदर पार्टीत सहभागी झाले.ब्रिटिशांच्या विरोधात लढण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.या पार्टीचे ते सदस्य झाले नंतर त्यात मुख्य सदस्य झाले.एक नोव्हेंबर 1913रोजी गदर पार्टीच्या नावावर एक वर्तमानपत्र सुरू केले. ते पंजाबी,हिंदी,उर्दू,बंगाली, गुजराती व इतर भाषांमध्ये प्रकाशित होत असे. छातीठोक पणे ब्रिटिश सरकारला उखडून टाकण्यासाठी आपली मिशन आहे, हे त्यांनी स्पष्ट केले.ते साहस न्यायाधिशांना पसंत नव्हते कसे ते पाहू.1914साली त्यांनी भारतात विद्रोह केला.विशेष म्हणजे 1915मध्ये अनेक क्रांतिकारक यांचेसह ते लाहोर षडयंत्रात सहभागी झाले.म्हणून त्यांना सजा झाली. जेल मध्ये न्यायाधीश उद्गारले, "उसे अपने किए गए अपराधोपर बहुत गर्व है l वह दयाका पात्र नहीं है और उसे फांसी दी जानी चाहिए l"अशाप्रकारे कर्तार सिंग सरा भा तसेच विष्णू गणेश पिंगळे आणि त्यांच्या सात जोडीदार यांना 16नोव्हेंबर1915रोजी लाहोर सेंट्रल जेल मध्ये फाशी देण्यात आली.क्रांतिकारक निष्ठा वंतांस त्रिवार वंदन!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

---

# अमुदान कंपनीतील बाधितांना नुकसान भरपाई द्या !

### सर्व पक्षी युवा मोर्चाची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : येथील एमआयडीसी परिसरातील अमुदान कंपनीच्या बॉयलर स्फोट झालेल्या घटनेला एक वर्ष पूर्ण होत आहे. कंपनीत झालेल्या भीषण बॉयलर स्फोटाने संपूर्ण परिसर हादरला. या दुर्दैवी अपघातात १३ कामगारांचा मृत्यू झाला आणि ६७ लोक गंभीर जखमी झाले. स्फोट इतका तीव्र होता की २ ते ३ किलोमीटरच्या परिघात असलेल्या शेकडो घरांचे मोठे नुकसान झाले. मात्र एक वर्ष पूर्ण होवूनही बाधितांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. या विषयी सरकारचा निषेध सर्व पक्षीय युवा मोर्चाने जाहीर बैठक घेवून सरकारच्या धोरणावर टिका केली.

कल्याण शीळ रोडवरील श्री साईबाबा मंदिर, सोनरपाडा येथे सर्व पक्षीय युवा मोर्चा माध्यमातून डोंबिवली स्फोटातील नुकसानग्रस्त भूमिपुत्र आणि स्थानिक भूमिपुत्रांनी जाहीर बैठकीत सरकारबद्दल निषेध व्यक्त केला. यावेळी व्यासपीठावर संतोष केणे, गजानन पाटील, एडवोकेट शिवराम गायकर, महेश संते, कर्सन पाटील, एडवोकेट राजेश जाधव, सुनील पाटील, दत्ता वझे, रामचंद्र पाटील, रतन पाटील, बाळाराम ठाकूर आदी उपस्थित होते.

यावेळी गजानन पाटील यांनी सांगितले की, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. तथापि, एक वर्ष उलटूनही, स्फोटात बाधित झालेल्या स्थानिक नागरिकांना त्यांच्या नुकसानीची भरपाई मिळालेली नाही. त्या वेळी केलेल्या पंचनाम्यानुसार १३ कोटी ९० लाख रुपयांचे नुकसान झाले. परंतु आतापर्यंत सरकारने कोणतीही भरपाई केलेली नाही. दरम्यान न्याय द्या न्याय द्या डोंबिवली एमआयडीसी मधील भूमिपुत्राला न्याय द्या, डोंबिवलीचे भोपाळ होवू देवू नका, धोकादायक कंपन्या स्थलांतर करा, स्फोटातील नुकसानग्रस्तांना तातडीने भरपाई द्या, आश्वासने नको पंचनामे फक्त कागदावरच नको.नुकसान ग्रस्तांना भरपाई लवकर द्या असे बॅनर बधितानी हाती घेतले होते. यावेळी स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी सरकारकडे मागणी केली आहे की लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावी, जेणेकरून बाधित कुटुंबांना दिलासा मिळू शकेल.

---

# कोट्यवधींचे नुकसान : सहकारी उपनिबंधकाची होणार उच्चस्तरीय चौकशी

## – माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या मागणीला यश

### नोंदणी मुद्रांक नियंत्रक विभागाच्या महानिरीक्षकांकडून ७ दिवसांत चौकशीद्वारे अहवाल सादर करण्याचे महसूल मंत्र्यांचे आदेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : स्थानिक विकासकाच्या फायद्यासाठी विकासकाच्या संगनमताने मुद्रांक शुल्कामध्ये राज्य शासनाचे कोट्यवधीचे नुकसान करणाऱ्या मागाठणे 17 येथील सहकारी उपनिबंधकाच्या चौकशीचे आदेश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. याप्रकरणात भाजपाचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधत उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली होती. त्याची राज्याच्या महसूल मंत्र्यांनी गंभीर दखल घेत नोंदणी आणि मुद्रांक नियंत्रक महानिरीक्षकांना चौकशी करून 7 दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याची माहिती नरेंद्र पवार यांनी दिली आहे.

मुंबईतील मागाठणे 17 येथील उपनिबंधक अधिकारी संजय साळवे हे याठिकाणी गेल्या दीड वर्षांपासून कार्यरत आहेत. एखाद्या व्यक्तीला त्याच्या मालमत्तेची नोंदणी करायची असेल तर उपनिबंधाकडे अर्ज करावा लागतो. मग उपनिबंधक कागदपत्रांची पूर्तता करून मालमत्तेचे नोंदणीपत्र देतात. आणि त्यासाठी शासनाने ठरवलेल्याप्रमाणे लागणारे शुल्क घेतात. मग त्याप्रमाणे शासनाला महसूल उत्पन्न होत असतो. परंतु गेल्या दीड वर्षांपासून संजय साळवे यांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करून स्वतःच्या आणि नोंदणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी येणाऱ्या विकासक - सामान्य नागरिकांच्या फायद्यासाठी शासनाला मिळणारा मुद्रांक शुल्क यात कोट्यवधी रुपयांचे नुकसान करत असल्याची तक्रार माजी आमदार नरेंद्र पवार यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. तसेच या दस्तऐवज मूल्यांकनामध्ये घोळ घोळ करून केंद्र आणि महाराष्ट्र शासनास दिल्या जाणाऱ्या मुद्रांक शुल्कामध्ये तफावत दाखवून कागदपत्रांच्या नोंदणीसाठी येणाऱ्या गरजू व्यक्तींकडून पैसे उकळत असल्याचेही निदर्शनास आल्याचे पवार यांनी म्हटले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून पुराव्यासाठी त्यांनी दस्त नोंदणी क्रमांक.२३८६, दिनांक.१४/२/२०२५ ही या तक्रारीसोबत सादर केला आहे.

या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता याबाबत उच्चस्तरीय चौकशी करून मुद्रांक शुल्काचे उल्लंघन करणाऱ्या उपनिबंधक अधिकारी संजय साळवे यांची सखोल चौकशी करावी. आणि शासनास मुंद्रांक शुल्कात झालेले कोट्यवधींचे नुकसान या अधिकाऱ्याकडून वसूल करण्याची मागणी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती.

त्यावर या गंभीर प्रश्नी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही तातडीने दखल घेत नोंदणी आणि मुद्रांक नियंत्रक महानिरीक्षकांना याप्रकरणी चौकशी करून 7 दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहितीही माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली आहे.

---

# खर्डीत दाखले वाटप शिबीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापुर : शहापुरचे तहसीलदार परमेश्वर कासुळे यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डी मंडळ अधिकारी अजय अरबड व खर्डी तलाठी योगेश भोई यांच्या उपस्थितीत खर्डी हायस्कूल मध्ये दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या शिबिरात उत्पन्न दाखले (218),रहिवास दाखले(25),नॉनक्रेमिनल(26) व रेशनकार्ड(22) असे एकूण 291 दाखले वाटप करण्यात आले.तर किनव्हली येथील शिबिरात 386 दाखले वाटप करण्यात आले.

खर्डी परिसरातील खर्डी,दहिगाव, जरंडी, दळखन,चांदा, वरसकोल, धामणी, उंबरखंड ह्या गावपाड्यातील गोरगरीब आदिवासी नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.आटगाव(27 मे),शहापुर (30 मे शेतकी भवन ),गोठेघर(5 जून ग्राप वाफे),शेणवा (19 मे प्राथमिक आरोग्य केंद्र),डोळखांब(2 जून),वासिंद(3 जून सरस्वती विद्यालय) व कसारा(23 मे) या मंडळ व तलाठी कार्यालयात सकाळी 11 ते 5 यावेळात शिबिराचे आयोजन करण्यात आले असून स्थानिक गरजवंतांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी केले आहे.

खर्डी येथील शिबिरात सरपंच मंगला गावित, नायब तहसीलदार एच. घुटे,खर्डी मंडळ अधिकारी अजय अरबड,खर्डी तलाठी योगेश भोई,मुख्यध्यापक विलास साळवे, मनसेचे खर्डी शहराध्यक्ष सगीर शेख, सोमनाथ म्हसकर, अनिल सापळे यांच्यासहीत महसूल विभागातील अधिकारी उपस्थित होते

---

## खरीप हंगाम : गुणवत्ता निगराणीसाठी
# ठाणे जिल्ह्यात भरारी पथकांची स्थापना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : खरीप हंगामाला सुरुवात झाल्याने जिल्ह्यात रासायनिक खते आणि बी-बियाण्यांचा पुरवठा सुरू झाला आहे. याबाबत गुणवत्तेची सुनिश्चिती करण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ठाणे जिल्ह्यात एक जिल्हास्तरीय आणि पाच तालुकास्तरीय अशा एकूण सहा भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

या भरारी पथकांच्या माध्यमातून कृषी निविष्ठांमध्ये गुणवत्तेची काटेकोर तपासणी, तक्रारींचे त्वरित निवारण आणि बेकायदेशीर विक्रीवर नियंत्रण ठेवण्याचा उद्देश आहे.

**भरारी पथकांची कामे:**

- जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या तक्रारी भरारी पथकातील सदस्यांकडे थेट मांडाव्यात.
- बी-बियाणे व रासायनिक खते विक्री करताना शेतकऱ्यांना खरेदीची बिले दिली जातात की नाही याची तपासणी केली जाईल.
- निविष्ठा विक्री पावत्यावर शेतकऱ्यांची सही घेतली जाते का याची तपासणी केली जाईल.
- विनापरवाना निविष्ठा विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.
- विक्रेत्यांची नोंदणी प्रमाणपत्रे व परवाने वैध आहेत का याची खातरजमा केली जाईल.
- गुणवत्ता नियंत्रणा संबंधित इतर सर्व जबाबदाऱ्या देखील यामार्फत पार पाडल्या जातील.

**भरारी पथकांची रचना:**

**जिल्हास्तरीय भरारी पथक:**

- पथक प्रमुख: कृषी विकास अधिकारी
- सदस्य: संबंधित उपविभागीय कृषी अधिकारी, मोहिम अधिकारी (जिल्हा परिषद), निरीक्षक (वैध मापन शास्त्र), जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक

**तालुकास्तरीय भरारी पथक:**

- पथक प्रमुख: तालुका कृषी अधिकारी
- सदस्य: कृषी अधिकारी (तालुका कृषी कार्यालय), निरीक्षक (वैध मापन शास्त्र), मंडल कृषी अधिकारी, कृषी अधिकारी (पंचायत समिती)

जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी खते व बियाणे खरेदी करताना बिले घेतल्याची खात्री करावी, तसेच कोणतीही तक्रार असल्यास भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. कृषी विभागामार्फत गुणवत्तेची हमी देण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात असून शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ही पथके सक्रियपणे कार्यरत असतील, अशी माहिती कृषी विकास अधिकारी मुनिर बाचोटीकर यांनी दिली.

---

# बोगस टीसी रेल्वेतून अटकेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याणः लोकमान्य टिळक टर्मिनसहून सुटणाऱ्या कुशीनगर एक्सप्रेसमध्ये तिकीट तपासणीसारखा पेहराव करून एक बनावट तिकीट तपासणीस प्रवाशांची तिकिटे तपासत होता. ही बाब साध्या वेशात याच एक्सप्रेसमध्ये प्रवाशांची तिकिटे तपासणाऱ्या मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणीसाच्या निदर्शास आली. रेल्वेच्या तिकीट तपासणीसांनी बनावट तिकीट तपासणीची माहिती घेताच तो बनावट असल्याचे आढळले. या बोगस टीसीवर गुन्हा दाखल करून अटक केली. रामप्रकाश रामजीवन मंडल (४०) असे अटक करण्यात आलेल्या बनावट तिकीट तपासणीसाचे नाव आहे. मध्य रेल्वेचे मुख्य तिकीट तपासणीस हरेश किसन दहिलकर यांनी बनावट तिकीट तपासणीसाविरुध्द कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

---

# सरळगाव मधील नामांकित उद्योजक काशिनाथ झुंजारराव यांचे निधन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड कल्याण राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या प्रसिद्ध बाजारपेठ सरळगाव येथील मधील नामांकित व्यक्तिमत्व उद्योजक तथा देशमुख मराठा समाज मंडळाचे ठाणे जिल्हाध्यक्ष काशिनाथ (आबा) झुंजारराव यांचे वयाच्या ६८ वर्षीय शुक्रवारी सकाळी दहा वाजता तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात दोन मुले ,पत्नी, सुना, दोन भाऊ, नातवंडे असा मोठा परिवार तसेच इतर नातेवाईक असून त्यांच्या जाण्याने संपूर्ण नेवाळपाडा/ सरळगाव गाव तसेच संपूर्ण ठाणे



जिल्हा देशमुख मराठा समाज व इतर समाज बांधवांकडून दुःख व्यक्त केले जात आहे. त्यामुळे संपूर्ण सरळगाव परिसरावर मोठी शोक कळा पसरली आहे.

त्यांच्या अंत्ययात्रेत सर्व पक्ष पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते, व सरळगाव पंचक्रोशीतील नागरिक,व व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

# रायगड जिल्ह्यासाठी नवीन पोलीस अधीक्षक हरिष बेकावडेंच्या पाठपुराव्याला यश

## आंचल दलाल नवे एसपी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यासाठी नवीन आयपीएस दर्जाचे पोलीस अधीक्षक नियुक्त करा याची मागणी सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांनी सातत्याने लावून धरली होती. त्याबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना दिनांक 21/2/25 पत्र देऊन अधिवेशन काळात व त्यानंतर सातत्याने मागणी करून प्रसारमाध्यमांनी त्यास प्रसिद्धी दिली होती. याची दखल घेऊन रायगड जिल्ह्यासाठी नवीन आयपीएस दर्जाचे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची महाराष्ट्र शासनाने नियुक्ती केली त्याबद्दल रायगड जनतेच्या वतीने आभार व्यक्त करतो.

रायगड जिल्ह्यातील वारंवार होणाऱ्या घटना लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांनी बेकायदेशीर चालणाऱ्या अवैद्य धंद्यांना चाप बसावा त्याचबरोबर मटका, जुगार, डान्स बार, ड्रग्स माफिया, बेकायदेशीर भंगार माफिया,रेव पार्टी, बलात्कार घटना, अपघात, खून, दरोडे, कायदा सुव्यवस्था बिघडणे, व्यसनाधीनता,वाळू माफिया, माती माफिया, त्याचबरोबर तळागाळामध्ये याच्यातूनच गुंडगिरी निर्माण झालेली होती याची दक्षता घेऊन नवीन आयपीएस दर्जाचे रायगड जिल्ह्यामध्ये पोलीस अधीक्षक असावे व रायगड जिल्ह्यातील



छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीमध्ये अशा प्रकारचे कृत्य वारंवार घडू नयेत यासाठी नवीन पोलीस अधीक्षकांची तात्काळ नियुक्त करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्याची दखल महाराष्ट्र राज्य शासनाने घेऊन नवीन पोलीस अधीक्षक नियुक्त केलेले आहेत.

त्यांच्या नियुक्तीने पोलीस खात्यातील प्रत्येक तालुक्यातील विविध घटनांचा अभ्यास करून यापुढे अतिशय चांगल्या प्रकारे बदल घडून येईल यात शंका नाही. त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्था चांगल्या प्रकारे राखण्याचं काम व अवैध व्यवसायांना चाप बसेल असे असे मत सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांनी व्यक्त केले.






# भिवंडी निजामपूर मनपा आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्ज



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** येत्या पावसाळ्यात संभाव्य घटना आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या तयारीचा आढावा यानुषंगाने आज भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांचे अध्यक्षतेखाली शहरामध्ये कार्यरत विविध आस्थापना व कार्यान्वित यंत्रणांच्या प्रतिनिधींसोबत आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये आयुक्तांनी प्रामुख्याने धोकादायक इमारती, पुर परिस्थती निर्माण होणाऱ्या क्षेत्राचा आढावा, नागरीकांना स्थलांतरीत करावयाची वेळ आल्यास त्याची पर्यायी व्यवस्था, त्यांना लागणाऱ्या जेवणाची पाकिटे, आवश्यक सुविधांची तयारी, नाले सफाई, पाणी साचुन त्यामध्ये जर विद्युत प्रवाह प्रवाहित झाला तर करावयाची तातडीची उपाययोजना, वाहतुक कोंडी होऊ नये म्हणुन उपाययोजना, पावसाळ्यामध्ये उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांवर नियंत्रण मिळण्यासाठी वैद्यकीय आरोग्य विभागाची तयारी, शहरामध्ये पावसाळ्यात कचरा साठुन दुर्गंधी व रोगराई पसरु नये याकरिता आरोग्य विभागाकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा, शहरामध्ये विविध यंत्रणांकडुन सुरू असलेल्या कामाचा देखील आढावा घेण्यात आला.

आयुक्तांनी या आढावा बैठकीमध्ये महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या यंत्रणांकडून सुरू असलेली रस्त्याची विकास कामे कोणत्याही परिस्थितीत मॉन्सुनपुर्वी पुर्ण करण्याच्या सुचना दिल्या. तसेच, पोलीस विभागाला देखील सुचना दिल्या की, कोणत्याही परिस्थीतीमध्ये शहरामध्ये वाहतुक कोंडी होता कामा नये. आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रभाग स्तरावर आणि मुख्यालयस्तरावर 24x7 मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी. पुढील 4 महिने कोणीही रजेवर जाऊ नये. तसेच, मुख्यालय सोडण्यापुर्वी आयुक्तांची परवानगी घेण्यात यावी. प्रभाग कार्यालय, मुख्यालयातील आपत्ती वव्यस्थापन विभागातील सर्व दुरध्वनी क्रमांक सुरू आहेत आणि पुढील सर्व काळ सुरू राहतील याची खबरदारी आपत्ती व्यवस्थापन प्रमुख यांनी घ्यावी. कोणत्याही परिस्थतीमध्ये दुरध्वनी बंद राहता कामा नये. वैद्यकीय आरोग्य विभागाने आपत्कालीन परिस्थतीसाठी एक आपत्कालीन कक्ष सुरू करावा. तसेच, सर्व प्रकारच्या साथीचे आजार, अपघात घडल्यास त्यावर आवश्यक त्या सर्व औषधांचा साठा मुबलक प्रमाणात करण्यात यावा. जेणेकरुन, ऐनवेळी औषधे कमी पडणार नाहीत.

जर एखाद्या ठिकाणी पाणी साचुन त्या ठिकाणी विद्युत प्रवाह पाण्यात प्रवाहीत झाल्यास टोरेंट कंपनीने तातडीने कारवाई करुन त्या भागातील विद्युत पुरवठा बंद करावा. वृक्ष अधिकारी यांनी शहरातील सर्व वृक्षांच्या धोकादायक फांद्याच्या छाटणी करावी, तसेच, ज्या वृक्षांच्या फांद्या ह्या विद्युत प्रवाहाला अडथळा ठरत असतील, त्यांची तातडीने छाटणी करावी. अग्निशमन विभागाने बोटी, अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी. तसचे, जनसंपर्क विभागाने शहरामध्ये या आपत्कालीन परिस्थीतीमध्ये काय करावे व काय करु नये याची जनजागृती करण्यात यावी. सर्व महत्त्वाचे दुरध्वनी क्रमांक प्रसिद्ध करावे. आपत्कानलीन परिस्थतीमध्ये सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करुन नागरीकांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

प्रभाग अधिकाऱ्यांनी शहरामध्ये 27 ठिकाणी पुर परिस्थती निर्माण होणाऱ्या स्थानांची यादी निश्चित केली आहे. या ठिकाणी जर पुर परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने जवळपासच्या समाज कार्यालय, शाळा येथे नागरीकांना स्थलांतरीत करुन त्यांच्या निवासाची व जेवणाची व्यवस्था करावी.

सर्व यंत्रणांच्या प्रमुखांनी या पुढील काळामध्ये एकमेकांशी सातत्याने समन्वय साधुन हे काम पार पाडावे, असे आवाहन आयुक्तांनी केले. या प्रसंगी महानगरपलिकेचे मा. अति. आयुक्त (1) श्री. देविदास पवार, मा. अति. आयुक्त (2) श्री. विठ्ठल डाके, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. सचिन सांगळे, उपायुक्त (मुख्या) श्री. विक्रम दराडे, उपायुक्त (मार्केट) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर यांचेसह महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महसुल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, पोलीस विभाग, टोरेंट पॉवर यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अशी माहिती महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी दिली.

# कल्याण : सप्तशृंगी इमारत दुर्घटना प्रकरण

## चौथ्या मजल्यावरील रहिवाशाला अटक - फॉरेन्सिक चौकशी सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेत चिकणीपाडा परिसरात पाज मजली सप्तश्रृंगी इमारतीच्या चौथ्या माळ्यावरील स्लॅब कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत 6 जणांचा मृत्यू झाला. तर 6 जण जखमी झाले. या भयानक घटनेमुळे कल्याणमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या इमारतीला कल्याण डोंबिवली महापालिकेने धोकादायक इमारत घोषित केलं होतं. पण तरीही तिथे नागरिक राहत होते. ही दुर्घटना घडण्यामागील कारण आता समोर आलं आहे. तसेच या प्रकरणी कोळसेवाडी पोलिसांनी चौथ्या माळ्यावर राहणारा कृष्णा चौरसिया या व्यक्तीला अटक केली आहे. त्याला 5 दिवसांची पोलीस कोठडी देखील सुनावण्यात आली आहे.



इमारतीच्या चौथ्या माळ्यावर फ्लोरिंगचे काम सुरू होते. याच दरम्यान ही दुर्घटना घडली. चौथ्या मजल्यावरील घराचे बांधकाम सुरू असताना तो भाग कोसळला. त्यानंतर तिसरा आणि दुसरा मजलाही कोसळला. या घटनेत 6 जणांचा जीव गेला. या प्रकरणी कोळशेवाडी पोलिसांनी चौथ्या माळ्यावरील घरमालक कृष्णा चौरसिया याच्या विरोधात गुन्हा दाखल करत त्याला बेड्या ठोकल्या आहेत. तसेच या दुर्घटनेनंतर केडीएमसीने या सप्तश्रृंगी इमारतीसह आजूबाजूच्या चाळी रिकाम्या केल्या आहेत. या इमारत आणि चाळींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांचे कल्याण पूर्व येथील शाळांमध्ये तात्पुरतं पुनर्वसन करण्यात आलं आहे. संबंधित इमारत धोकादायक असल्याचं घोषित करण्यात आलं होतं. तसेच केडीएमसीचे आयुक्त अभिनव गोयल यांनी 'जे' वॉर्डमधील अधिकाऱ्यांना इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश दिले होते. तरीही चौरसिया यांनी त्यांच्या घरात नूतनीकरणाचे काम सुरू केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णा चौरसिया याचं त्याच परिसरात एक लहान पान टपरीचं दुकान आहे.

> "घटनेनंतर मंगळवारी रात्री आरोपीला अटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले आणि पुढील चौकशीसाठी पोलिस कोठडी सुनावण्यात आली. आम्ही सखोल चौकशी करत आहोत आणि जर इतर कोणी जबाबदार आढळले तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. प्राथमिक चौकशीत असे दिसून आले आहे की चौरसिया यांनी सोसायटी किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक परवानग्या घेतल्या नव्हत्या."
>
> - एसीपी कल्याणजी घेटे

*******************

> फॉरेन्सिक टीमने सप्तश्रृंगी सहकारी गृहनिर्माण संस्थेला भेट दिली आणि वाळू, माती, फरशा, विटा आणि सिमेंटसह नमुने गोळा केले - बांधकामादरम्यान निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले आहे का हे निश्चित करण्यासाठी मलब्याचे नमुने मुंबईतील फॉरेन्सिक प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.
>
> -सचिन तामखेडे
> वॉर्ड अधिकारी - केडीएमसी

## राजकारण्यांचा वरदहस्त – भूमाफियांचा हैदोस

# मीरा भाईंदरमध्ये कांदळवनाची कत्तल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** कांदळवनाचे सर्वतोपरी रक्षण करावे, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले असतानाही हे आदेश धाब्यावर बसवून मीरा रोड, भाईंदरमध्ये राजकारणी, भूमाफिया आणि बिल्डरांनी अक्षरशः धुडगूस घातला आहे. त्यांनी वनविभाग, महसूल विभाग, महापालिका व पोलिसांना मॅनेज करून शेकडो एकर जागेवरील खारफुटीची बेसुमार कत्तल करून हिरवेगार जंगल बेचिराख केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, वनविभागाने 'एमआरसॅक' नकाशा बनवून त्या जागेवर असलेले कांदळवन नकाशात न दाखवता गायब केल्याने त्याचा मोठा फायदा भूमाफिया आणि बिल्डरांना झाला असून शेकडो एकर कांदळवन जमिनीवर भराव टाकून टोलेजंग



इमारती उभ्या करत पर्यावरणाचा गळा घोटला आहे.

ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर हे मुंबईच्या अत्यंत लगतचे शहर असल्याने या भागातील लोकसंख्या झपाटयाने वाढली. त्यामुळे स्वाभाविकच जागांची मागणीही वाढली. शहरातील जागा संपुष्टात आल्याने मीरा, भाईंदरमधील विस्तीर्ण खाडीकिनाऱ्यावरील संरक्षित कांदळवनावर राजकारणी, भूमाफिया आणि बिल्डरांची वक्रदृष्टी पडली. त्यातूनच कांदळवन क्षेत्रावर बेसुमार भराव होऊ लागले. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कांदळवन क्षेत्रात व त्याच्या 50 मीटर बफरझोनमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास बंदी घालण्यात आली. मात्र ही कांदळवने गिळण्यासाठी राजकारणी, भूमाफिया आणि बिल्डरांच्या अभद्र युतीने रात्रीच्या वेळी या कांदळवनाला आगी लावल्या. विषारी रसायनांची फवारणीही करण्यात आली. काही ठिकाणी भराव टाकून कांदळवन जमिनीत दाबून टाकण्यात आली, तर काही ठिकाणी छाटणी करून कत्तल करण्यात आली. गेल्या काही वर्षांपासून कांदळवनाच्या जमिनी हडप करून त्यावर टोलेजंग टॉवर उभारत करोडो रुपये कमवण्याचा गोरखधंदा मीरा, भाईंदरमध्ये प्रचंड जोरात सुरू आहे.



# नॅक मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मुदतवाढ

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. 23 :** राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि महाविद्यालयांना संधी देण्यासाठी, महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन किंवा पुनर्मूल्यांकन प्रक्रियेसाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित सर्व पात्र महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन व पुनर्मुल्यांकन करणे अनिवार्य असून, नॅक मूल्यांकन हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे मापदंड असून शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा सुधारण्यासाठी दर पाच वर्षांनी महाविद्यालयाचे मूल्यांकन/पुनर्मुल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य अग्रेसर असून नॅक मूल्यांकनात प्रथम क्रमांकावर आहे. सध्या नवीन दुहेरी मानांकन प्रणाली लागू करण्याच्या प्रक्रियेमुळे नॅक बंगलोरने पोर्टल अद्ययावत करण्याचे काम हाती घेतले आहे. पोर्टल कार्यान्वित होताच महाविद्यालयांनी त्वरीत नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू करावी, असे निर्देशही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. तसेच याबाबत विद्यापीठांनी संबंधित महाविद्यालयांकडून लेखी हमीपत्र घेऊन, आवश्यक त्या कार्यवाहीस तातडीने सुरुवात करावी, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या आहेत.

# सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओक यांना मातृशोक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओक यांच्या मातोश्री वासंती ओक यांचे बुधवारी रात्री दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या. त्यांप्रकृती अस्वस्थामुळे वासंती यांच्यावर ठाण्यातील एका खाजगी रुग्णालयात गेल्या दोन तीन दिवसांपासून उपचार सुरु होते. तिथेच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात न्या. अभय ओक आणि दंत शस्त्रक्रियाकार अजित ओक ही या दोन मुलांसह सूना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. आज त्यांच्या पार्थिवावर जवाहरबाग स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



गुरुवारी सकाळी त्यांच्या राहत्या घरी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यावेळी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, आजी माजी न्यायमूर्ती, काही विधिज्ञ यांच्यासह अन्य मान्यवरांनी अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या निधनाने मान्यवरांनी शोक व्यक्त केले.

वासंती यांचे खणखणीत बोलणे आणि तसेच वागणे होतेच. आत्मविश्वास आणि स्वावलंबन ही त्यांची गुणवैशिष्ट्ये होती. वागण्यातील काटेकोरपणा कोणालाही थक्क करणारा होता. स्वच्छता हा तर त्यांचा जणू अलंकार होता. त्यांना गणपतीची विविध भावमुद्रेतील, आसनातली तसेच अन्य पेंटींग्ज काढण्याची प्रचंड हौस होती. त्या उत्कृष्ट चित्रकार होत्या, वाचनाचा त्यांना प्रचंड व्यासंग होता. वासंती यांनी लिहिलेली आत्मवृत्तपर काही आठवणी वाचण्याचे भाग्य कित्येकांना लाभले. विविध व्याधींशी त्या टक्कर देत होत्या, त्यातही त्यांचा धीरोदात्त स्वभाव चकित करणाराच आहे. प्रचंड जिद्द, सहनशीलता, संवेदनशीलता, संयम ही त्यांची गुणवैशिष्ट्ये होती.

# राज्यातील २३ पोलीस उपयुक्त आणि अधिक्षकांच्या बदल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील 21 पोलीस उपायुक्त व पोलीस अधीक्षक दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या गुरुवारी गृहविभागाचे सहसचिव व्यंकटेश भट यांनी केल्या असून, तीन पोलीस उपायुक्तांची मुंबई शहरात बदली करण्यात आली आहे.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची मुंबई शहर, रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची अहिल्यानगर, पुण्याच्या राज्य राखीव पोलीस बलाचे समादेशक आंचल दलाल यांची रायगड, कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांची ठाणे शहर, अकोल्याचे पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांची नागपूरच्या राज्य राखीव पोलीस बलाच्या समादेशकपदी, नागपूरचे पोलीस उपायुक्त अर्चित चांडक यांची बदली अकोला येथे करण्यात आली आहे.

मुंबई आर्थिक गुन्हे शाखेचे विशेष कृती दलाचे पोलीस उपायुक्त मंगेश शिंदे यांची नागपूर लोहमार्ग विभागात, कायदा व सुव्यवस्थेचे सहाय्यक महनिरीक्षक राजतिलक रोशन यांची मुंबई, पालघरचे अधीक्षक बाळासाहेब पाटील यांची नाशिक ग्रामीण, गडचिरोली अभियानचे अप्पर अधीक्षक यतिश देशमुख यांची पालघर, सिंधुदुर्गचे अधीक्षक सौरभअगरवाल यांची पुणे गुन्हे अन्वेषण विभाग, ठाण्याचे उपायुक्त मोहन दहिकर यांची सिंधुदुर्ग, बुलढाणा अधीक्षक विश्व पानसरे यांची अमरावती राज्य राखीव बलाचे समादेशक, नागपूर गुन्हे अन्वेषण विभागाचे अधीक्षक निलेश तांबे यांची बुलढाणा, सातारा अधीक्षक समीर अस्लम शेख यांची मुंबई शहर, पुणे लोहमार्गचे अधीक्षक तुषार दोषी यांची सातारा, लातूरचे अधीक्षक सोमय विनायक मुंडे यांची छत्रपती संभाजीनगर परिमंडळ एक, पुणे एटीएसच्या अधीक्षक जयंत मीना यांची लातूर, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस उपायुक्त नितीन बगाटे यांची रत्नागिरी आणि सांगलीच्या अप्पर अधीक्षक रितू खोकर यांची धाराशीव येथे पोलीस अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे.






## जाहीर नोटीस
### गाडी ट्रान्सफर बाबत

लोकांच्या माहीतीसाठी याद्वारे कळविण्यात येते की; कै. त्रिंबक मल्या काळण यांचे दिनांक 15/03/2025 रोजी निधन झालेले आहे.

त्यांच्या नावे असलेल्या ऑटो रिक्षा नंबर MH-05-Z-7409, दुचाकी हिरो पॅशन प्लस नंबर, MH-05-AH-4131, दुचाकी होन्डा ड्रिम युगा नंबर MH-O5-CW- 4131, चारचाकी मारुती अल्टो नंबर MH-06-AS-4106, आणि चारचाकी टोयोटा इनोव्हा क्रिस्टा नंबर MH-05- EV-4131 असे आहेत.

सदर ऑटो रिक्षा, दोनचाकी आणि चारचाकी त्यांची पत्नी रेणुका त्रिंबक काळण यांच्या नावे करण्यास कोणास काही हरकत असल्यास कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर हरकत घ्यावी.

सही/-
श्रीमती रेणुका त्रिंबक काळण
मातोश्री सिताबाई निवास,
आजदेगाव, डोंबिवली (पूर्व) 421 203


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| X | https://x.com/@Jeevandeepvarta |
| Facebook | https://www.facebook.com/jeevandeepnews |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep |
| Web | https://jeevandeepvarta.com |


# अंबरनाथमध्ये ऐंशी हजाराची घरफोडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. २२ (वार्ताहर) :** अंबरनाथमध्ये एका सुतारकाम करणाऱ्याच्या घरातून ८० हजार रुपये लंपास करून चोरटा फरार झाल्याची घटना घडली आहे. या संदर्भात अंबरनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, तपास सुरू आहे. अंबरनाथ पश्चिम येथील सिद्धार्थनगर गेट वॉटर सप्लायच्या मागे भगतसिंगनगरमध्ये मोहम्मद रईस मोहम्मद सलीम खान हे राहतात. ते ४२ वयाचे असून सुतार काम करतात. भगतसिंग नगरमधील त्यांच्या राहत्या घराच्या लोखंडी कापटाचे तिजोरी तोडून तब्बल ८० हजारांची रक्कम चोरट्याने लंपास केली. ही घटना बुधवारी (ता. २१) रात्री दीड ते दोनच्या सुमारास घडली आहे. दुसऱ्या दिवशी चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर मोहम्मद सलीम यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत गुन्हा दाखल केला आहे.




# अकरावी प्रवेशाची वेबसाईट २६ मे पासून होणार सुरू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील उच्च माध्यमिक बोर्डाकडून 11 वीच्या ऑनलाइन (Admission) प्रवेश प्रक्रियेचा गोंधळ संपता संपेना झाला आहे. शिक्षण संचालनालयाकडून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी आता नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून अकरावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश 26 मे पासून सुरू होणार आहेत. गेल्या 2 दिवसांपासून ऑनलाईन प्रवेशासाठी धडपड करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी 4 दिवस थांबावे लागणार आहे. बुधवार 21 मे रोजी प्रत्यक्षात सुरू होणारी ऑनलाइन अकरावी (SSC results) प्रवेशाची प्रक्रिया वेबसाईटमधील तांत्रिक अडचणीमुळे सुरू होऊ शकली नाही. त्यानंतर, आता महाराष्ट्र शिक्षण महामंडळाकडून 26 मे ही नवीन तारीख देण्यात आली असून 26 मे ते 3 जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश घेता येईल.

राज्य शिक्षण महामंडळाने दिलेल्या नव्या वेळापत्रकानुसार 26 मे ते 3 जूनपर्यंत म्हणजे 9 दिवस ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यानंतर, 5 जून रोजी पहिली जनरल मेरीट लिस्ट लागणार आहे. 6 ते 7 तारखेपर्यंत विद्यार्थ्यांना आपल्या हरकती नोंदवून तक्रार करता येईल. त्यानंतर, 8 जून रोजी अंतिम जनरल मेरीट लिस्ट जाहीर होईल.

विद्यार्थ्यांना 26 मे ते 3 जून दरम्यान आपल्या पसंतीचे कॉलेज क्रमांक निवडता येतील, त्यासोबतच संपूर्ण अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा अर्ज भरता येणार आहे. तर, अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी 10 जूनला जाहीर होईल, अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली आहे.

# शहापूर, मुरबाडच्या शेतकऱ्यांचे १५ कोटी रखडले



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शेतकऱ्यांच्या भाताला हमीभाव मिळावा यासाठी सरकारने आधारभूत खरेदी योजना सुरू केली खरी. मात्र भाताची रक्कम मिळविण्यासाठी दोन महिन्यांपासून बळीराजाची फरफट सुरू आहे. शहापूर, मुरबाडच्या तीन हजार शेतकऱ्यांचे 15 कोटी सरकारने लटकवले असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. दरम्यान, ट्रिपल इंजिन सरकारमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याने बळीराजामध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. सरकारच्या नियोजनशून्य कारभारामुळे गेल्या दोन महिन्यांपासून शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर दिलेल्या भाताची रक्कम त्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. आदिवासी विकास महामंडळाकडून शहापूर व मुरबाड तालुक्यातील नऊ खरेदी केंद्रांतर्गत 12 हजार 368 शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी जानेवारी महिन्यापासून 5 हजार 534 शेतकऱ्यांकडून 1 लाख 25 हजार 308 क्विंटल भाताची खरेदी करण्यात आली. त्यापैकी 2 हजार 693 शेतकऱ्यांच्या 13 कोटी 90 लाख 13 हजार 725 कोटी रकमेचे वाटप झाले आहे. मात्र उर्वरित 2 हजार 841 शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या 64 हजार 868 क्विंटल भाताचे तब्बल 14 कोटी 91 लाख रुपये शासनाने थकवले असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. दरम्यान, खरेदी केलेल्या भाताची रक्कम तातडीने द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. यंदा शेतीची कामे कशी करायची? खरेदी केंद्रांवर चांगली रक्कम मिळेल अशी आशा बाळगून असलेल्या शेतकऱ्यांचा मात्र भ्रमनिरास झाला आहे. निसर्गाचा कोप आणि त्यातच बी-बियाणे, खते, औषधे, मजुरी, ट्रॅक्टरचे वाढणारे दर यामुळे शेतकरी मेटाकुटीस आला आहे. हातात पैसे नसल्यामुळे यंदा शेतीची कामे कशी करायची, हा प्रश्न शेतकरीवर्गापुढे उभा राहिला आहे.

कागदपत्रांची तपासणी सुरू गेल्या तीन वर्षांत भात खरेदीत झालेल्या कोट्यवधींच्या घोटाळयामुळे शेतकऱ्यांच्या कागदपत्रांची तपासणी केली आहे. त्यामध्ये काही शेतकऱ्यांच्या सातबारामध्ये असलेल्या क्षेत्राचा बेकायदेशीररीत्या बदल केल्याचे आढळून आले. त्याची छाननी सुरू असल्याची माहिती आदिवासी विकास महामंडळाकडून देण्यात आली आहे.

शेतकऱ्यांचे प्रश्न कर्जाची परतफेड शेतकरी भात विकून करत असतो. मात्र खरेदी केंद्रावर भात विकूनही पैसे मिळाले नसल्याने कर्ज कसे भरायचे? कर्जाची परतफेड केली नसल्याने नवीन कर्जदेखील मिळण्याच्या आशा मावळली असल्याने शेतकरी आर्थिक पेचात सापडला आहे.

# पुलाआधी रस्ता रुंदीकरण करा

## – नागरिकांची मागणी

### पुणा- लिंक रोड रुंद न केल्यास वाहतूक कोंडीची भीती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्व पश्चिम जोडणाऱ्या नव्या उड्डाणपुलाचे काम सुरु केले जाणार असून या पुलाआधी पुना लिंक रस्ता रुंदीकरण होणे गरजेचे आहे. अन्यथा या मार्गावर मोठी वाहतूक कोंडी आणि अपघात होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

महापालिकेचे ड प्रभाग कार्यालय ते विजयनगर पर्यंतच्या उतारावरील रस्ता अपघाताचा हॉटस्पॉट ठरला य. या रस्त्यावर गेल्या महिनाभरात सहा गंभीर अपघात झालेत. त्यामुळे भविष्यात अपघात आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुलाचे काम करण्या आधी पुना- लिंक रस्ता रुंदीकरण करा अशी मागणी नागरिकानी केली आहे.



कल्याण पूर्वेकडील पुना- लिंक रस्त्यावरील तीव्र उतारावर सातत्याने अपघात होत असून ड प्रभाग कार्यालय येथे विजयनगर हा परिसर अपघाताचे हॉटस्पॉट बनला आहे. मागील काही दिवसात या ठिकाणी झालेल्या अपघातात तीन ते चार नागरिक जखमी झाले असून चार ते पाच दुकानाचे तसेच वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी या रस्त्याचे रुंदीकरण तितकेच महत्त्वाचे आहे.

कल्याण पूर्वेत सूचक नाका ते श्रीराम चौक पर्यंत होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी कल्याण पूना लिंक रोड ते कल्याण पश्चिम प्रेम ऑटोपर्यंत ७५० कोटी रुपये खर्चून उड्डाणपूल उभारले जाणार असून या पुलाचे काम पश्चिमेकडून सुरु करण्यात आले आहे. तर पूर्वेकडील बाजूने भूसंपादन प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान या पुलाचे काम सुरू झाल्यास पुना लिंक रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

तसेच रस्त्यावरून पूल उभारले गेल्यानंतर हा रस्ता आणखीअरुंद होणार असल्याने रस्त्यावरून पूल उभारण्या आधी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. म्हणूनच प्रशासनाने रस्त्याच्या रुंदीकरनाकडे तातडीने लक्ष देत हे काम मार्गी लावावे अशी मागणी कल्याण पूर्व येथील स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# रायते विभाग हायस्कूल मधील दहावीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : पद्मश्री अण्णा साहेब जाधव व भारतीय समाज उन्नति मंडळ भिवंडी संचालित रायते विभाग हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय रायते तालुका कल्याण या विद्यालयात इयत्ता 10 वी मध्ये प्रथम व द्वितीय क्रमांकात उतीर्ण झालेल्या विद्यार्थीचा त्यांच्या घरी जाऊन सत्कार करण्यात आला

प्रथम= क्र कु घारे अस्मिता विलास, ८८टक्के

द्वितीय = कु सोनावणे समीक्षा बाळाराम ८६.८० टक्के

तृतीय =कु भोईर स्नेहांजली संतोष 84-80 टक्के

यांचे शालेय समितीचे चेअरमन तथा जेष्ठ पत्रकार श्री जैतू मुठोळकर, मुख्याध्यापक, श्री सी एस पाटील सर यांनी त्यांच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# दुर्घटना घडलेल्या इमारतीतील रहिवाश्यांचं पुनर्वसन होणार का ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील चिकणीपाडा सप्तशृंगी इमरतीचा स्लॅब कोसळल्याच्या दुर्घटनेत सहा जणांना मृत्यूला सामोरे जावे लागले तर अनेक जण जखमी झाले होते. दुर्घटना घडलेल्या इमारतीतील रहिवाश्यांच्या मदतकार्यासाठी पालिका प्रशासनाने सदरची इमारत खाली करून रहिवाश्याची तात्पुरती राहण्यासाठी व्यवस्था शाळेमध्ये केली असून इमारत दुर्घटना ग्रस्त रहिवांशानी आमचे पुनर्वसन करा अशी मागणीसाठी कल्याण डोंबिवली आयुक्तांची शुक्रवारी दुपारी भेट घेतली. यावेळी निवेदन देत आपली व्यथा आयुक्तांसमोर मांडल्या या प्रसंगी भाजपा आमदार सुलभा गायकवाड, शिवसेना शिंदे गटाचे कल्याण पूर्व शिवसेना शहर प्रमुख निलेश शिंदे हे देखील रहिवासी शिष्टमंडळासबोत होते. रहिवाश्यांच्या शिष्टमंडळाने दिलेले निवेदन घेत आयुक्तांनी दुर्घटना इमारत खाजगी मालमत्ता असल्याने तसेच यासंदर्भात



पुनर्वसन धोरण नसल्याने पुनर्वसन होऊ शकत नाही. इमारत रि डेव्हलपमेंटसाठी प्रस्ताव मनपाकडे आल्यास पालिका प्रशासन मदत करेल असे आश्वासन शिष्टमंडळास दिले.

शिष्टमंडळाने झालेल्या चर्चेचे इतिवृत्त मिळावे असे यानिमित्ताने सांगितले, असल्याचे रहिवासी शिष्टमंडळाने प्रसिद्धी माध्यमांना माहिती दिली. दुर्घटना ग्रस्त इमारत रहिवासी शिष्टमंडळात रेखा पाठारे, सुधीर लांवडे आदिसह दुर्घटना ग्रस्त इमारतीतील रहिवासी होते. आयुक्तांच्या स्पष्टोक्तीमुळे ऐन पावसाळा सुरू होण्याच्या तोंडावर सप्तशृंगी इमारत दुर्घटना ग्रस्त रहिवासीना घरासाठी घरघर करावी लागणार असे चित्र यानिमित्ताने दिसत आहे. पुनर्वसन संदर्भात लवकरच मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन देत आपले गर्हाणे मांडणार असल्याचे देखील दुर्घटना ग्रस्त इमारत रहिवाशानी माहिती दिली.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ठाणे जिल्हा ग्रामीण संपर्क कार्यालयाचे उद्घाटन





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष श्री भरत (भाऊ) गोंधळे यांच्या ठाणे जिल्हा ग्रामीण कार्यालयाचे उदघाटन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करण्यासाठी पूर्ण ताकदीने उभे रहा अशा सूचना राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांच्या कडून उपस्थित कार्यकर्ते यांना करण्यात आल्या. कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी नेटाने पुढे जाऊन पक्ष संघटना अधिकाधिक मजबूत करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारावर चालणारा पक्ष आहे तसेच स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या विकासात्मक धोरणावर चालणारा पक्ष आहे. म्हणूनच पक्षाचे विचार पुढे नेण्यासाठी सर्वांनीच आपलं योगदान देणे गरजेचे आहे असेही हिंदुराव यांनी यावेळी सांगितले. ठाणे जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष भरत भाऊ गोंधळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सदर कार्यालय हे समस्त पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासाठीच आहे व अखंडपणे खुले ठेवून गोर गरीब जनतेचे, कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध राहू या असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रदेश चिटणीस डी के विशे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रतिक हिंदुराव, रविंद्र परटोले, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत एगडे, प्रविण देशमुख, सुरज मुकादम, जिल्हा सरचिटणीस प्रभाकर शेळके, अरुण जाधव, राम सुरोशे, सोशल मीडिया जिल्हा अध्यक्ष प्रफुल्ल शेवाळे, कल्याण तालुका अध्यक्ष बाळाराम कोर, कल्याण तालुका कार्याध्यक्ष रविकांत पाटील, तालुका सरचिटणीस विलास सोनावले, शहापूर युवक अध्यक्ष दिनेश चंदे, व्हीजेएनटी सेलचे कल्याण तालुका अध्यक्ष सागर राठोड, सतीश सासे, राहुल गोंधळे, रोहित म्हात्रे, मिहीर खाडे यासह जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडी मनपा क्षेत्रातील धोकादायक इमारतींचे निष्कासन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महानगरपालिकेने मॉन्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने शहरातील धोकादायक व अतिधोकादायक इमारती निर्मनुष्य करण्याची मोहिम हाती घेतली आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून दि. ०१ मे ते २० मे, २०२५ या कालावधीत शहरातील २१ अतिधोकादायक इमारतींचे निष्कासन करण्यात आले आहे. यामध्ये प्रभाग १ मधील १ इमारत, प्रभाग ३ मधील ५ इमारती, प्रभाग ४ मधील १२ इमारती आणि प्रभाग ५ मधील ३ इमारतीचे निष्कासन करण्यात आले आहे. तसेच, शहरातील ज्या इमारतींना धोकादायक/अतिधोकादायक म्हणून घोषीत केले आहेत, अशा १०४ इमारतींचा विद्युत व पाणी



पुरवठा खंडीत करुन त्या इमारतींची निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. तरी, नागरीकांनी अशा इमारती तातडीने निर्मनुष्य करावी, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे. ज्या इमारतीमधील नागरीक इमारत खाली करण्यास नकार देतील त्या इमारती पोलीस बळाच्या सहाय्याने निर्मनुष्य करण्याच्या सुचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# कळभोंडे गाव दहा दिवसांपासून अंधारात | वीज वितरणचे अक्षम्य दुर्लक्ष


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : तालुक्यातील आदिवासी बहुल भाग असलेल्या कळभोंडे ग्रामपंचायत हद्दीतील वीज वितरणचे विद्युत पोल पडल्याने येथील वीज व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याने लोडशेडिंग व्यतिरिक्त तब्बल दहा दिवस लाइट गायब झाली आहे.महावितरणकडून यावर कुठलीच उपाययोजना होत नसल्याने परिसरातील गावावर अंधारात राहण्याची नामुष्की ओढवली आहे.सतत वीजपुरवठा खंडित होत असल्याने विजेशी संबंधित व्यवसायिकांवर संक्रांत आली आहे.

कसारा भागातील १ हजार ३५० लोकसंख्या असलेल्या कळभोंडे ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या नविनवाडी, लादेवाडी या भागात वादळी वाऱ्याने वीज वितरणचे पोल भुईसपाट केले आहेत. ग्रामपंचायतीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कसारा सेक्शनला पत्रव्यवहार करुन १५ दिवस झाले तरी त्याची दखल घेतली नसल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य शिवाजी वीर यांनी दिली.या भागात कायम वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.दिवसेंदिवस वीज प्रश्न वाढत असल्याने यावर कायमस्वरूपी आणि दीर्घकालीन उपाययोजना होणे गरजेचे असल्याचे वीर यांनी सांगितले.

## ग्रामस्थच झाले लाईनमन

मागील तीन आठवड्यापासून शहापूर तालुक्यात अवकाळी पावसाचे वातावरण आहे.याचा फटका सर्वाधिक बसतोय तो



ग्रामीण भागाला.पाऊस आणि वादळ यामुळे वीज वितरण कंपनीचे वाभाडे निघाले. कळभोंडे भागात या वादळी वाऱ्यात पडलेले विजेचे पोल ग्रामपंचायतीने पत्रव्यवहार करून १५ दिवसानंतरही उभे करण्यात आले नाहीत.त्यामुळे येथील ग्रामस्थ सुरेश अगिवले,हरेश गिरा,भालचंद्र खडके पोलीस पाटील व शिवाजी वीर यांनी पुढाकार घेऊन इतर ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नाने गुरुवारी मध्यरात्रीपर्यंत विद्युत पोल उभे करुन वीज प्रवाह सुरळीत करण्यात आला.मेंटेनन्सच्या नावाखाली लाखो रुपयांचा चुराडा होऊनही दरवर्षी विजेचा खेळ खंडोबा सुरूच असतो. गावखेड्यातही माणसं राहतात याचा विसरच महावितरण वाल्यांना पडतो काय असा प्रश्न पडल्यावचून राहत नाही.




# सांगाव पाड्यात कचऱ्याची समस्या गंभीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगर पालिका ई प्रभागातील सांगाव येथे कचरा एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. पालिका प्रशासन कचरा व्यवस्थापनासाठी अनेक उपाययोजना करत आहे परंतु अजूनही कचरा प्रश्न करदात्या नागरिकांच्या आरोग्याला कारणीभूत ठरत आहे. महाराष्ट्र राज्य सरकार शहरात स्वच्छता राखण्यासाठी करोडो रुपयांचा निधी खर्ची करत आहे. तरीही दुर्गंधीयक्त कचऱ्याचे ढीग साचात असल्याने नागरिकांच्या आरोग्यचा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. कचरामुक्त सागाव झालं नाही तर मनसे तोच कचरा पालिकेच्या कार्यालयात टाकेल असा इशारा मनसे शाखाप्रमुख जीतेन पाटील यांनी दिला.

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेत प्रशासकीय राजवट असूनही अधिकारी



कचरा प्रश्नावर दुर्लक्ष करीत आहेत. पालिकेत समाविष्ट असलेल्या २७ गावात कचऱ्याचा मोठा प्रश्न असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे. सागाव मोठा पाडा येथे कचऱ्याचे ढीग साचले असून परिसरात दुर्गंधी होत आहे. सध्या कोरोनापासून काळजी घ्या असे आरोग्य विभाग सांगत असले तरी शहरात मात्र कचऱ्यामुळे लोक हवालदिल झाले आहेत. मनसे शाखाप्रमुख जितेन पाटील यांनी विभागातील कचऱ्याची स्थिती अधिकाऱ्यांसमोर उघड केली असली तरी अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्र कचरामुक्त करण्यासाठी काम सुरू आहे. ज्यामध्ये कचरा संकलन, कचरा वाहतूक आणि रस्त्यांची स्वच्छता यांचा समावेश असला तरी सध्याची कचऱ्याची परिस्थिती भयंकर असून ग्रामीण विभागातील लोकांचे आरोग्य एरणीवर आहे..महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे हरीश पाटील (शहर संघटक), जतीन पाटील (शाखा अध्यक्ष), अनिल दाभाडे (उपविभाग अध्यक्ष), प्रभाकर भोवड (उपशाखाध्यक्ष) यांनी याबाबत अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करताना सांगितले की, नुकतेच कचरा विषयी अनेक प्रकल्प पालिका प्रशासनाच्या माध्यमातून लोकार्पण करण्यात आले. यामध्ये शहरात तसेच ग्रामीण भागात कचऱ्याचे ढीग दिसणार नाहीत, रस्ते स्वच्छ राहतील, कचऱ्याचे नियोजन करून कचऱ्याची विल्हेवाट लावली जाईल असे सांगण्यात आले होते. पण कचरायुक्त दुर्गंधीमुळे येथील परिस्थिती घाणेरडी झाली असून येथील नागरिक हैराण होत आहेत. जर ताबडतोब दुर्गंधीयुक्त कचरा उचलला नाही तर तोच कचरा पालिकेच्या कार्यालयात टाकणार असेही जितेन पाटील यांनी सांगितले. याबाबत पालिका आरोग्य अधिकारी लांडगे यांनी मौन बाळगले.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024